C. S. (Main) Exam : 2011

D-DTN-L-NSA

# MARATHI

## Paper I

## (Literature)

*Time Allowed : Three Hours* | *Maximum Marks : 300*

### *INSTRUCTIONS*

***Candidates should attempt questions no. 1 and 5 which are compulsory, and any THREE of the remaining questions, selecting at least ONE question from each Section.***

***The number of marks carried by each question is indicated at the end of the question.***

***Answers must be written in Marathi.***

## SECTION A

**1.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास शब्दांत लिहा : *15×4=60*

(a) भाषेचा विचार एक चिन्हव्यवस्था म्हणून कसा करता येतो ते स्पष्ट करून स्वनिमविचार म्हणजे काय ते सांगा.

(b) प्रमाणभाषा आणि बोली भाषा यांच्या वैशिष्ट्यांची भाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून चर्चा करा.

(c) विशेषणापासून नाम बनविण्याची प्रक्रिया सोदाहरण सांगा.

(d) लोकगीतांमधील प्रतिमासृष्टीचे सोदाहरण वर्णन करा.

2. (a) डांगी ही मराठीची बोली की गुजरातीची या वादाची भाषाशास्त्रीय चिकित्सा करा.

(b) सामाजिक स्वरांप्रमाणे भाषा कशी बदलते ते विविध उदाहरणे देऊन स्पष्ट करा.

*30×2=60*

3. (a) मराठीतील विभक्तींची माहिती देऊन त्यांच्या कारक अर्थांची चर्चा करा.

(b) इतर अव्ययांपेक्षा शब्दयोगी अव्ययांचे वेगळेपण सोदाहरण सांगा.

*30×2=60*

4. (a) लोकगीते आणि लोककथा यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व विशद करा.

(b) वारकरी कीर्तन आणि नारदीय कीर्तन यांतील साम्यभेद स्पष्ट करा.

*30×2=60*

## SECTION B

5. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास शब्दांत लिहा : *15×4=60*

   (a) कवी नरेन्द्राच्या 'रुक्मिणी स्वयंवर' या काव्याची पृथगात्म वैशिष्ट्ये सांगा.

   (b) 'लावणी' या काव्यप्रकारामधील होनाजीचे योगदान विशद करा.

   (c) बा.भ. बोरकर यांच्या कवितेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

   (d) साहित्यकृतीची समीक्षा करताना तिच्या निर्मिती मागील लेखकाची भूमिका लक्षात घेणे आवश्यक आहे का ? सकारण लिहा.

6. (a) आधुनिकतावाद या संकल्पनेचे स्वरूप स्पष्ट करा.

   (b) विभावरी शिरूरकरांच्या कथांची स्त्रीवादी दृष्टिकोनातून चर्चा करा. *30×2=60*

7. (a) समकालीन सामाजिक-राजकीय स्थित्यंतरांचे प्रतिबिंब कुसुमाग्रजांच्या काव्यात कसे उमटत गेले ते विशद करा.

   (b) मराठीतील ऐतिहासिक नाटकांच्या वाटचालीचे टप्पे स्पष्ट करा. *30×2=60*

8. (a) दलित कवितेत डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान कसे प्रतिबिंबित झालेले आहे, ते सोदाहरण स्पष्ट करा.

   (b) मराठी ग्रामीण कथेतून व्यक्त झालेल्या ग्रामीण जीवनाच्या यथार्थतेची चिकित्सा करा. *30×2=60*